# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune Metropolitan Region Development Authority, Pune**

**३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पिंपरी — चिंचवड, पुणे ४११०४४**

Ph.No. : ०२०- २५९ ३३ ३४४ / ३५६ / फोन. नं. ०२०- २५९३३३४४/ ३५६ /३३३Email:comm@pmrda.gov


जा.क्र.:विकास परवानगी विभाग/आ.चिन्ह/ २६३७ दि.१९/०८/२०२६

## जाहिर सूचना

**विषय :-** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रातील सर्व आकाशचिन्हांची माहिती संकलन करण्याकरीता AI Based Hording Detection System तयार करुन घेणेबाबत...

**संदर्भ:-** १) शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भांसख -२०१४.प्र.क्र.८२/भाग- III/ उद्योग- ४ दि.०१/१२/२०१६ व सुधारित दि.०७/०५/२०२१

२) मा. महानगर आयुक्त यांची मान्य टिपणी दि.०४/०८/२०२६

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रातील सर्व आकाशचिन्हांची माहिती संकलन करण्याकरिता AI Based Hording Detection System तयार करुन घेणे प्रस्तावित आहे. शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. भांसख -२०१४.प्र.क्र.८२/भाग- III/उद्योग-४ दि.०१/१२/२०१६ रोजीच्या सुधारीत खरेदी नियम पुस्तिकेतील परीच्छेद ३.२.३ अन्वये, संदर्भीय ४ नुसार (दि.०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार) शर्ती व अटीनुसार खुल्या बाजारातून कमीत कमी तीन पुरवठादाराकडून तुलना करण्याकरीता मागविण्यात यावे असे शासन निर्णयात नमूद आहे. त्याअनुषंगाने, सदर AI Based Hording Detection System तयार करुन घेणेसाठी या सूचनेसोबत जोडलेल्या अटी व शर्तीसह तसेच Scope of Work (SoW) प्रमाणे खुल्याबाजारातून कमीत कमी तीन पुरवठादाराकडून तुलना करण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे.

- दरपत्रके स्विकारण्याचा कालावधी दि. १९/०८/२०२६ ते दि. २७/०८/२०२६ वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत आहे. तसेच सदर दरपत्रके दि. २८/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील.
- दरपत्रकाच्या अटी व शर्ती सोबत दिलेल्या सूचनेनुसार दरपत्रके भरून दि. २७/०८/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत संचालक, विकास परवानगी व नियोजन, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, ३ रा मजला, पुमप्रविप्रा, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पुणे ४४ यांचेकडे सादर करण्याची कार्यवाही करावी.

**(अविनाश पाटील)**
संचालक,
विकास परवानगी व नियोजन विभाग,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

## दरपत्रक अटी व शर्ती

१. दरपत्रके संस्थेच्या छापील लेटर हेडवर असणे आवश्यक असून त्यावर छापील PAN कार्य /GST नंबर असावे.
२. दरपत्रक बंद पाकिटात सादर करण्यात यावे. पाकिटावर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रातील सर्व आकाशचिन्हांची माहिती संकलन करण्याकरीता AI Based Hording Detection System तयार करुन घेणेसाठी दरपत्रक असे नमूद करुन विभागप्रमुख, विकास परवानगी विभाग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचे नावे देण्यात यावे.
३. दरपत्रके स्विकारण्याचा कालावधी दि. १९/०८/२०२६ ते दि. २७/०८/२०२६ वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत आहे. तसेच सदर दरपत्रके दि. २८/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. उपरोक्त मुदतीनंतर दरपत्रक प्राप्त झालेस त्याचा विचार केला जाणार नाही.
४. केंद्र किवा राज्य शासनाच्या किंवा प्राधिकरण कार्यालयाच्या सेवेशी संबंधित असलेल्या कोणत्याही संबंधित असलेल्या कोणत्याही पुरवठादाराकडून / इसमाकडून दरपत्रके स्वीकारले जाणार नाही याबाबत प्रमाणपत्र देण्यात यावे.
५. एकदा भरलेले दरपत्रक भरलेले दरपत्रक रद्द करता येणार नाही, असे झाल्यास दरपत्रक भरलेल्या व्यक्तीचे / फर्मचे नाव काळ्या यादीत समविष्ट केले जाईल.
६. उघडण्यात आलेल्या दरपत्रातील सर्वात कमी दर (एल-१) स्वीकृत करण्यात येईल.
७. कार्यारंभ आदेश तारखेपासून ८ दिवसाच्या आत आदेश स्वीकृत करावा अन्यथा एल-२ यांना कार्यारंभ आदेश देण्यात येईल
८. संबंधित कामाचे बिल अदा करण्यापूर्वी केलेल्या कामाची गुणवत्ता तपासून बील अदा केले जाईल. तसेच, उपलब्ध करून देण्यात आलेले साहित्य असमाधानकारक असल्यास बिल अदायगी केले जाणार नाही.
९. दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार संचालक, विकास परवानगी व नियोजन, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी राखून ठेवलेले आहेत.
१०. पुरवठादाराने अर्जात नमूद केलेला पत्ता हाच पत्रव्यवहाराचा पत्ता समजला जाईल व त्या पत्यावर पाठवलेले पत्र पुरवठादारास मिळाले असे गृहीत धरले जाईल. त्या पत्यावर पाठविलेले पत्र, आदेश पुरवठादारास मिळाले नाही हे स्पष्टीकरण स्वीकारले जाणार नाही. यास्तव पत्रव्यवहाराचा संपर्क क्र., इमेल आईडी, पूर्ण पत्ता पिनकोड सह नमूद करावा.
११. दरपत्रक २८/०८/२०२५ रोजी, सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येणार असून पुरवठादार अथवा प्रतिनिधी यांनी समक्ष उपस्थित राहणे बंधनकारक आहे.
१२. आपण केलेल्या कामाचा दर्जा समाधानकारक नसल्यास कोणतेही पुर्वसूचना न देता आपला कार्यारंभ आदेश रद्द करणेचा हक्क मा. अतिरिक्त महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

**<u>दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीत पुढीलप्रमाणे सादर करावीत.</u>**

**लिफाफा - अ**

१. कंपनी नोंदणी प्रमाणपत्र
२. PAN कार्ड

३. GST प्रमाणपत्र

४. अटी शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र

उपरोक्त कागदपत्राच्या सांक्षाकित प्रती सत्यप्रत करुन लिफाफा क्र.१ मध्ये सीलबंद करुन लिफाफ्यावर पुरवठादाराचे नाव, पत्ता नमूद करुन लिफाफा क्र. १ पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रातील सर्व आकाशचिन्हांची माहिती संकलन करण्याकरीता AI Based Hording Detection System तयार करुन देणेकरीता दरपत्रक असा त्यावर उल्लेख करावा.

**लिफाफा - ब दराचे प्रपत्र**

सदर लिफाफा क्र.२ मध्ये आर्थिक दरपत्रक सीलबंद करुन लिफाफ्यावर पुरवठादाराचे नाव, पत्ता नमूद करुन लिफाफा क्र. २ पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रातील सर्व आकाशचिन्हांची माहिती संकलन करण्याकरीता AI Based Hording Detection System तयार करुन घेणे आर्थिक दरपत्रक असा उल्लेख करावा. दरपत्रकधारकाने सदर दोन्ही लिफाफे (क्र.१ व क्र. २) एका पाकीटात घालून त्यावर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रातील सर्व आकाशचिन्हांची माहिती संकलन करण्याकरीता AI Based Hording Detection System तयार करुन देणेकरीता दरपत्रक असा उल्लेख करून पुरवठादाराचे नाव, पत्ता, मोबाईल क्र. ठळक अक्षरात नमूद करुन, सीलबंद पाकीट दि. २७/०८/२०२६ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पुणे ४४ यांचेकडे सादर करावीत.

**(अविनाश पाटील)**
संचालक,
विकास परवानगी व नियोजन विभाग,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

# हमीपत्र

(संस्थेच्या छापील लेटरहेड वर असणे आवश्यक आहे)

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रातील सर्व आकाशचिन्हांची माहिती संकलन करण्याकरीता AI Based Hording Detection System तयार करुन देणेकरीता दरपत्रक सादर करणेसाठी असणाऱ्या सर्व अटी व शर्ती मला/ आम्हाला मान्य आहेत.

दिनांक :-

ठिकाण :-

स्वाक्षरी,

दरपत्रक धारकाचे नांव----------

पत्ता ----------------------------

दुरध्वनी/ मोबाईल क्र.-----------